नि.दि.दा.क्रं.०५/२०१८

दशरथ वि. शासन

**नि.क्रं ११५ खाली आदेश**

वादीने दि.प्र.संहीता १९०८ क्रम १ नियम १० अन्वये अर्ज देऊन नमूद केले की, दि.३१/०३/२०२३ रोजी प्र.वादी क्रं. ४ ने उपविभागीय जलसंधारण अधिकारी श्री काशीनाथ रेवप्पा नाबदे यांना दावामिळकतीचे खरेदीपत्र करुन दिले. त्यासाठी सदर काशीनाथ यांनी सामील पक्षकार करावे.

२. प्र.वादी क्रं. ४ तर्फे नि.क्रं.१२० लगत अर्जास म्हणणे प्राप्त झाले. त्यांच्या कथनाप्रमाणे गट क्रं. १५६ क्षेत्र ४४ आर ही मौजे वडारवाडी जमीन प्र.वादी क्रं. ४ याने शासनाच्या प्रतिनीधीना दि.३१/०३/२०२३ रोजी खरेदीपत्राने विकली परंतू त्यापूर्वीच सन २०१३ मध्ये या जमीनीचा ताबा शासनाने प्र.वादी क्रं. ४ कडून घेतला होता. ही बाब वादीला माहिती होती. सदरची बाब प्रतिवादीने आपल्या कैफीयतीत नमूद केली आहे. कैफीयत सन २०१८ मध्ये दिली आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मुदतबाहय आहे.

३. रे.दि.मु.क्रं.३६१/१९९६ हा गट क्रं.१५६ बद्दल नव्हता. मात्र, त्यात तडजोड करताना, मुळ दावा दुरुस्त केला नव्हता. तडजोडपत्रासोबत गट क्रं. १५६ चा सातबारा उतारा जोडला नव्हता. त्या जमीनीचा मोबदला वादीने प्र.वादी क्रं ४ ला दिला नाही. त्यामुळे नि.क्रं.११३ चा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती करण्यात आली.

४. लोकसेवकाविरुध्द दावा दाखल केल्यापूर्वी शासनाला पक्षकार करावे लागते. भूसंपादनाचा निवाडा जाहीर होउनही त्याला मा.उच्च न्यायालयात वादीने आव्हान दिले नाही. त्यामुळे अर्ज निष्फळ आहे. वादग्रस्त जमीनीवर वादीचा कब्जा नव्हता व नाही.

५. दि.१२/११/२०१८ रोजी मुद्दे निश्चीत झाले असून वादीने नि.क्रं.५३ दि.१६/१०/२०२१ रोजी सरतपास दिला मात्र साक्षीयादी दिली नाही. प्र.वादी क्रं. ४ च्या नावे जमीन संपादीत झाली असून त्याचे स्टेटमेंट तयार करायचे चालू आहे म्हणून वादीने पुन्हा संयुक्त मोजणीला आव्हान दिले व मोजणीची फेर चौकशी केली. त्यात वादी असफल

झाला. वादीने स्वतचा व  साक्षीदाराचा तोंडीपुरावा देऊन त्यानंतर आपला पुरावा बंद केला. त्यामुळे  दुरुस्तीअर्ज मंजूर करता येणार नाही. दुरुस्तीने दाव्यात बदल होत आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर व्हावा अशी विनंती करण्यात आली.

६. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

७. दि.प्र.संहीता १९०८ क्रम २७ मध्ये शासकीय सेवकांच्या विरुध्द किंवा त्यांच्यावतीने दावा दाखल करण्याचे पध्दत नमूद आहे. त्यानुसार दाव्यात कथने  करावे लागतात. वर नमूद काशीनाथ याच्या लाभात झालेले खरेदीपत्र हे, तो शासन प्रतिनिधी म्हणून झालेले आहे.  सदर खरेदीपत्राच्या अनुषंगाने दिलेला दुरुस्तीअर्ज नामंजूर झाला आहे. त्यामुळे सदरच्या अर्जाने वर नमूद व्यक्तीला सामील पक्षकार करुन घेण्याचे कारण नाही. त्यामुळे अर्ज निरर्थक ठरतो.

**सबब आदेश**

१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

स्वाक्षरीत/-

**[एस.एन.सरडे]**

दिनांक:२९/०८/२०२५. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.